International Journal of Multidisciplinary Research and Development
Online ISSN: 2349-4182, Print ISSN: 2349-5979, Impact Factor: RJIF 5.72
www.allsubjectjournal.com
Volume 3; Issue 3; March 2016; Page No. 346-349

# दलित महिलावरील अत्याचार : शारिरीक, मानसिक व सामाजिक परिणामांचे विश्लेषण – संदर्भ जालना व औरंगाबाद जिल्हा

[1] डॉ. शेख नजीर जब्बार, [2] प्रा. नरसिंग आबासाहेब पवार
[1] **मार्गदर्शक**, मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई
[2] संशोधक, शंकररावजी चव्हाण कॉलेज ऑफ सोशल सायन्स ऍन्ड रिसर्च, रामनगर जालना

**प्रस्तावना**

प्रत्येक समाजव्यवस्थेत प्रत्येक काळात शक्तीशाली वर्गाने/व्यक्तीकडुन आपल्या पेक्षा दुर्बल, कमजोर व्यक्ती वर्गावर अत्याचार केले त्यांचे शोषण केले आहे. परंतु हे ही सत्य आहे की, स्त्री ही कोणत्याही वर्ग, जाती, धर्माची किंवा समाजाची असो अनेक दृष्टीने त्यांचे शोषण आणि त्यांच्यावरील अत्याचाराला सदैवच वैध ठरवले आहे. आणि खुप मोठया काळापर्यंत त्यांच्या स्थितीत सुधारणा करण्याचे विशेष प्रयत्न झाले नाहीत.

समाजातील निम्न वर्ग ज्यांना शुद्र किंवा आधुनिक काळात अनुसूचित जातीच्या नावाने ओळखले जाते. जी अनेक प्रकारच्या सांस्कृतिक संरचना, परंपरागत अर्थिक संबंध आणि सामाजिक संस्थाकडुन त्यांचे शोषण करण्यास स्विकृती दिली आहे. परिणामत: भारतीय समाजाचा एक महत्वपुर्ण अंश सामाजिक आणि अर्थिक दृष्टीने अत्यंत निम्न आणि असहाय्य परिस्थितीत जीवन जगत आहे (सिसोदिया 2000).

जातीव्यवस्थेच्या संदर्भात जे की कल्याणकारी, कार्यक्रम आणि योजना अनुसूचित जातीच्या (दलितांच्या) हितांसाठी निर्माण केल्या गेल्या त्यामध्ये या महिलांना कोठेही विशेष महत्व दिले गेले नाही. परिणामत: स्वातंत्र्यानंतर 65 वर्षानंतरही महिला कल्याण व अनुसूचित जातीचे कल्याणाच्या विशेष प्रयत्नानंतरही अनुसूचित जातीच्या महिलांमध्ये काही विशेष सुधारणा झाली तर नाहीच तसेच दलित महीलांच्या अत्याचाराच्या घटनांचे प्रमाणही कमी झाले नाही (प्यारे: 1991). समाजातील उच्च व्यक्तीकडुन दलित महीलांचे शोषण होत आहे केवळ जातीच्या आधारावर नव्हे तर लिंगाच्या आधारावर सुध्दा मनुस्मृतीचा कायदा व इतर वैदिक Scriptures व व्यक्तीगत माध्यमातुन दलित स्त्रियांच्या अर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सामाजिक विकासात अडथळा निर्माण केला आहे (मित्तल: 2010).

रॉय (2003) च्या मतानुसार दारिद्रय, निरक्षरता इत्यादी घटक महिलांच्या अडचणीस कारणीभुत ठरतात. दलित स्त्रियांच्या समस्या तिच्या स्वत:च्या संसारापासुनच सुरु होतो मग ती अशिक्षित असो की सुशिक्षित असो दलित्तोर स्त्रियांच्या दुखा:पेक्षा निश्चीतच तिचे दु:ख अतिशय दारुण आहे. सुशिक्षित दलित स्त्रिलाही आज मुक्तपणे वावरता येत नाही तिने आत्मविश्वासावर विवेकबुध्दीवर विश्वास ठेऊन स्वतंत्रपणे आपल्या क्षेत्रात पाऊल उचलेले तर तिला नावे ठेवली जातात नौकरीनिमित्त ज्या विभागात काम करावे लागते तिथे परिस्थिती भयानकच स्त्री म्हणुन व त्यातही दलित म्हणुन तिची हेटाळणी केली जाते.

**महिलावरील अत्याचाराचे परिणाम**

महिलेवर झालेल्या अत्याचाराचे गंभीर दुष्परिणाम महिलेवर होतात. अत्याचारामुळे शारीरीक व मानसिक परिणम लगेच जाणवतात या सोबतचे अत्याचारामुळे बळी पडल्यामुळे त्याचा सामान्य जीवनावर आयुष्यभर परिणाम झालेला जाणवतो (Jonson *et al.* 2008). याच अत्याचाराचा परिणाम संपुर्ण समाज व समाज व्यवस्थेवर झालेला दिसुन येतो (World Health Organisation: 2011) पिडीत महिलेच्या आर्थिक, सामाजिक व मानसिक कार्यक्षमतेवर पण अत्याचाराचा प्रभाव पडलेला दिसुन येतो समाजात वावरत असतांना सुध्दा न केलेल्या गुन्हयांची शिक्षा विविध स्वरुपात महिला सहज करत असते स्वत:ची लाज वाटणे अपमानित वाटणे इ सारख्या भावना बळकटीस लागत असतात सर्वासाधारणपणे पिडीत महिलेवर अत्याचाराचे सामाजिक, आर्थिक व मानसिक परिणाम स्पष्ट जाणवत असतात.

उद्देश:-

1) दलित महिलावर झालेल्या अत्याचाराचे स्वरूप व ठिकाण यांचे अध्ययन करणे
2) अत्याचाराचे सामाजिक जीवन व अंतरक्रिया यावर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.
3) अत्याचाराचा मानसिक, शारिरीक व आरोग्यावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करणे.

**संशोधन पध्दती**

**अध्ययन क्षेत्र व अध्ययन विश्व**

सदरील संशोधन अभ्यासासाठी जालना व औरंगाबाद जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचे विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडुन प्राप्त झालेल्या माहितीनुसार औरंगाबाद व जालना जिल्हयात 2000 ते 2011 या कालावधीत सवर्णाकडुन एकुण 210 दलित महिलांवर अत्याचार केले गेलेले आहेत. (210 दलित महिलांसोबत अत्याच्याराच्या घटना घडलेल्या आहेत) यातुनच संशोधन अभ्यासासाठी नमुना आकार ठरविण्यात आला आहे.

सदरील संशोधनाचे क्षेत्र हे केवळ जालना व औरंगाबाद जिल्हयापुरतेच मर्यादित असुन अत्याचाराचे स्वरुप, कारणे, शारीरीक मानसिक व सामाजिक परिणाम, पर्यंतच मर्यादीत आहे.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरुन तथ्य संकलनासाठी एकुण सम्रगातुन संभाव्य नमुना निवड प्रकारातील साधा यादृच्छीक नमुना निवड पध्दतीतील नियमित

अंकन तंत्राचा वापर करुन 100 एककाची नमुना म्हणुन निवड करण्यात आलेली आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे. प्राथमिक स्त्रोतात संशोधन विषयास अनुसरुन मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली आहे याच बरोबर पिडितांच्या कुंटूंबाबरोबर चर्चा, निरीक्षण, इत्यादी माध्यमांचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला.

दुय्यम स्त्रोतात संशोधन विषयास अनुसरुन संबंधीत पुस्तके, मासिके, ग्रंथ, नियतकालिके, अहवाल, प्रकाशित लेख, इंटरनेट, जाहीराती इत्यादीचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आलेले आहे.

**तथ्यांचे विश्लेषण**

**अत्याचाराचे स्वरुप व ठिकाण**

**सारणी क्रमांक 3.6**

| अ.क्र. | अत्याचाराचे स्वरुप | ठिकाण | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गावात | शेतात/कामाच्या ठिकाणी | घरी | इ. ठिकाणी | |
| 1 | विनयभंग | 21% | 17% | 07% | 08% | 53% |
| 2. | छेडछाड | 02% | - | - | - | 02% |
| 3. | बलात्कार | - | - | 03% | 02% | 05% |
| 4. | जातीवाचकशिवीगाळ | 10% | 14% | 10% | - | 34% |
| 5. | शारीरीक संबंध | 01% | 01% | - | - | 2% |
| 6. | लैगिंक छळ | 02% | 02% | - | - | 4% |
| | एकुण | 36% | 34% | 20% | 10% | 100% |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

ग्रामीण भागात दलिता विरुध्दच्या अत्याचारात विनयभंगाचा अग्रक्रम लागतो दलित महिला विषयी सवर्णाच्या संकल्पना व संबंधीत कुंटुंबास अपमानित करण्याकरीता विनयभंगासारख्या घटनांना मुर्त स्वरुप दिल्याचे दिसुन येते एकुण प्रतिसादकापैकी सर्वात जास्त 53% प्रतिसादकानी विनयभंग केल्याची तक्रार केली आहे. विनयभंगाच्या सर्वाधिक घटना गावात घडल्या आहेत (21%). तर स्वत:च्या शेतात किंवा दुसऱ्यांच्या शेतात रोजंदारीवर काम करतांना 17% घटना घडल्या तर 7% महिलांचा विनयभंग त्यांच्याच राहत्या घरी केला.इतरठिकाणी 8% महिलांचा विनंयभंग झालेला आहे या ü ठिकाणात शेतात जातांना, शौचालयास जातांना इ समावेश होतो.

पिडीतात छेडछाड हा प्रकार अविवाहीत स्त्रिया बरोबर झालेला आढळुन येतो एकुण पिडीतापैकी 2% महिलांची गावातच छेडछाड करण्यात आली होती. बलात्कारासारखे 5% घटना झाल्याचे अभ्यासादरम्यानलक्षात आले. बलात्कार करणाऱ्या गावातील व्यक्तीनी भिती दाखवुन 2% पिडीतांवर कामाच्या ठिकाणी बलात्कार केला तर 3% महिलांवर त्यांच्याच घरात बलात्कार केला बलात्कारास बळी पडणाऱ्या स्त्रिया हया अविवाहीत होत्या व त्यांचे शिक्षण चालु होते.

आजही ग्रामीण भागात दलितावरुन शिवीगाळ करण्यात येते. ग्रामीण भागात अत्यंत अश्लील अशा काही शिव्याचा वापर फक्त दलितांसाठीच करण्यात येत असतो. जातीवाचक शिवीगाळ 10% पिडीत महिलांना गावातच करण्यात आली यामुळे सर्व गावासमोर दलित स्त्री व तिच्या कुटुंबास अपमानित व्हावे लागले तर शेतावर रोजंदारीत काम करतांना कामाच्या ठिकाणी 14% महिलांना जातीवाचक शिवीगाळास सामोरे जावे लागले. तर 10% महिलांना त्यांच्याच घरी जाऊन शिवीगाळ करण्यात आली विनयभंगानंतर सर्वाधिक अत्याच्याराच्या स्वरुपात शिवीगाळ 34% चे प्रमाण अधिक आहे.

एकुण पिडीता पैकी 1% एका महिलेबरोबर गावातील व्यक्तीने अमिष, भिती, इ दाखवुन शारीरीक संबंध ठेवले होते तर 2% स्त्रियांना विविध ठिकाणी लैगिंक छळ करण्यात आला होता. वरील सारणीवरुन असा निष्कर्ष काढता येईल की भारतीय समाजात दलित स्त्रियांना हिनतेची वागणुक दिली जाते व दलित समाजास अपमानित करण्या करीता वा बदला घेण्याकरीता स्त्रियांवर गंभीर स्वरुपाचे अत्याचार करण्यात येतात यात लैगिंकतेशी व चारीत्र्याशी निगडीत गुन्हयाचे प्रमाण सर्वाधिक आहे. तर मानसिक दृष्टया खच्चीकरण करण्याकरीता लैगिंक गुन्हयाबरोबरच शिवीगाळ या सारखे गुन्हे शस्त्र म्हणुन सवर्णाकडुन वापरले जाते.

**सामाजिक आतंरक्रियावरपरिणाम**

| अ.क. | सामाजिक आतंरक्रिया | वाढ | कमी | बदलनाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मुक्त संवाद | 13 | 47 | 40 | 100 |
| 2. | इतर जातीतील व्यक्तीशी संवाद | 9 | 79 | 12 | 100 |
| 3. | शेजारी | - | 22 | 78 | 100 |
| 4. | नातेवाईक | 08 | 30 | 62 | 100 |
| 5. | सार्वजनिक कार्यक्रम | 00 | 60 | 40 | 100 |
| 6. | धार्मिक कार्यक्रम | - | 55 | 45 | 100 |
| 7. | लग्न समारंभ | - | 33 | 67 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

अत्याचारामुळे 47 टक्के महिलांना पुर्वी सारखा कुंटुंब, शेजारी, नातेवाईक यांच्याशी मुक्त संवाद साधतांना दिसत नाही. त्यांच्या मनावर अत्याचाराचे एक सारखे दडपण असते या शिवाय समाजात व गावात झालेली बदनामी व उलट सुलट छुपी चर्चा यामुळे 79 टक्के महिलांनी इतर समाजातील व्यक्ती बरोबर संवाद कमी केला आहे. अत्यावश्यक असेल तरच तात्पुरता संवाद साधला जातो तसेच संवाद साधतांना फार काळजी घेतांना दिसुन येतात.

शेजारी विशेषत: स्वजातीय व्यक्तीशी पण आतंरक्रियेवर अत्याचाराचा परिणाम झाल्याचे दिसुन येतो पिडीतापैकी 24% महिलांनी शेजा-यांशी संवाद/संपर्क कमी केला तर 78% पिडीता शेजा-यांशी अदयापही पुर्वी सारखेच संवाद साधतांना दिसत आहेत. त्यात कोणताही बदल झालेला नाही तर नातेवाईकांनी आंतर क्रिया करतांना 30% पिडितांनी अंतर ठेवले व त्यांच्याशी संवाद कमी केला पंतु 62% महिलांना नातेवाईका जवळचे व सांत्वन करणारे वाटतात त्यांचा आधार वाटतो त्यामुळे त्यांना त्यांच्याशी पुर्वीसारखेच संवाद साधतांना काहीच वाटत नाही.

अत्याचाराचा सर्वात जास्त परिणाम हा समाजात वावरत असतांना झाल्याचे दिसुन येतो विशेषत: लैंगिक छळ, बलात्कार, विनयभंग, या प्रकारचा त्रास झालेल्या पिडीतात सर्वाधिक आहे. कुंटुंब व नातेवाइकाखेरीज गावात झालेल्या प्रकरणाची उलट सुलट चर्चा व स्त्रिलाच जबाबदार धरण्याची प्रवृत्ती यामुळे पिडीत महिलांचे सार्वजनिक ठिकाणी वावरणे, सहभागी होणे यावर परिणाम झालेला दिसुन येतो या पिडीत महिला सार्वजनिक ठिकाणी जाण्याचे शक्यतो टाळतात याचे 60% प्रमाण आहेत तर फक्त 71% महिलच्या सार्वजनिक ठिकाणी वावरावर कोणताही परिणाम झालेला दिसुन येत नाही सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी न होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे जर सहभागी झाले तर झालेल्या प्रकरणाची अधिक चर्चा होऊन महिलेलाच जबाबदार मानतील वा परत चारित्र्यावर संशय घेतील ही भावना पिडितांशी झालेली दिसुन येते तर 40% पिडीतांच्या सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वावरात बदल झालेला नाही परंतु या पिडीत महिला सोबत लैंगिक अत्याचारा व्यतिरिक्त इतर प्रकारचे अत्याचार असणा-यांचे प्रमाण अधिक आहे.

अत्याचाराचा परिणाम कुंटुंबातील कार्यक्रम, लग्न समारंभ, वाढदिवस साजरा करणे इ.वर सुध्दा झाल्याचा दिसुन येतो या सर्व कार्यक्रमात कुंटुंबातील व्यक्ती व

नातेवाइकच जास्त प्रमाणात सहभागी झालेले असतात. तरी सुध्दा 33% पिडितांना सहभागी होण्याची इच्छा होत नाही वा त्या या कार्यक्रमात सहभागी होण्याचे टाळतात. त्यांच्या मते लग्न समारंभात सर्वच नातेवाइक येत असतात व जर आपण सहभागी झालो तर झालेल्या अत्याचाराविषयी उलट सुलट चर्चा होते व अस्थेवाइकपणे वा संशयाने सहभागी व्यक्ती पिडितांकडे पाहतात म्हणुन या प्रकारच्या कार्यक्रमात जाण्याचे महिला टाळतात तर 67% पिडितात काहीच बदल झालेला दिसुन येत नाही परंतु लग्न समारंभात सहभागी होतांना अत्यावश्यक असलेल्या ठिकाणी या पिडीता सहभागी होतात.

वरील विश्लेषणावरुन असा निष्कर्ष काढता येईल की अत्याचाराचे स्वरुपावरुन सामाजिक आंतरक्रियेवर परिणाम झाल्याचे दिसुन येते लैगिंक छळ, बालात्कार, विनयभंग या सारख्या अत्याचारास बळी पडलेल्या महिलात सामजिक, आतंरक्रिया जसे नातेवाइक शेजारी, सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम, लग्न समारंभ इ वर परिणाम झाला यातील सहभागात लक्षणिय घटझालेली दिसुन येते तर जातीवाचक शिवीगाळ सारख्या अत्याचारास बळी पडलेल्या महिलांत सामाजिक आंतर क्रियेत वाढ झाल्याचे दिसुन येते.

**मानसिक परिणाम**

दलित महिलेवर झालेल्या अत्याचारचे परिणाम फक्त आर्थिक व सामाजिक स्थितीवर झाला नाही तर मानसिक स्थितीवर झालेला दिसुन येतो पिडीत महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या स्वरुपानुसार सामान्य ते गंभीर स्वरुपाचे भावनात्मक परिणाम झालेले निदर्शनास येते लैगिंक अत्याचाराशी निगडीत महिलांत मानसिक परिणाम जास्त दिसतात.

झालेल्या अत्याचारामुळे 31% महिला बेचैन झाल्या किं वा उदासीन झाल्या. या महिलांच्या अत्याचारामुळे कोणत्याच गोष्टीत लक्ष लागत नव्हते तर आपण मागासवर्गीय आहात व सवर्णांनी पाहिजे तसा वापर करावा अत्याचार करावा, हिन वागणुक दयावी हया विचारांनी 19% महिलांना

झालेल्या अत्याचाराचा प्रचलित सामाजिक व्यवस्था व अत्याचार करण्या-या व्यक्तीचा राग आला होता. अत्याचार करणारे व्यक्ती विशिष्ट समाजाचे व बहुसंख्येने असल्यामुळे त्यंाची अत्याचार करण्याची हिमंत वाढते शासकीय यंत्रणा व राजकीय व्यवस्थेत याच व्यक्तीचें वर्चस्व असल्यामुळे पिडीतांवर निर्माण केलेल्या दबावामुळे पिडीतांवर निर्माण केलेल्या दबावामुळे 7% महिलांच्या मनात भिती निर्माण झाली होती काही पिडीतांनी तर भितीमूुळे घरातुन बाहेर पडणे ही बंद केले होते तर 6% महिलांत अस्वस्थता वाढली होती व 2% पिडीतांना दु:ख झाले होते

**सारणी क्रमांक 3.13**
**मानसिक परिणाम**

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | बेचैन/उदासीन | 31 | 31 |
| 2. | राग | 19 | 19 |
| 3. | भिती | 7 | 07 |
| 4. | अस्वस्थता | 06 | 06 |
| 5. | दु:ख | 02 | 02 |
| 6. | अपमानित | 10 | 10 |
| 7. | आघात | 02 | 02 |
| 8. | निद्रानाश | 6 | 6 |
| 9. | अपराध भावना | 07 | 07 |
| 10. | मुलांची काळजी | 01 | 01 |
| 11. | असुरक्षितता | 09 | 09 |
| | एकुण | 100 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

विनयभंग व बलात्कारा सारख्या अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांत विविध मानसिक तक्रारी आढळुन आल्यात, भिती, अस्वस्थता या बरोबरच 10% महिलांना स्वत:चा अपमान झाल्याची भावना वृध्दींगत झालेली आढळुन आली यामुळे त्यांच्या मनोधेर्यावरही परिणाम झालेला दिसतो तर 2% महिलांच्या मतानुसार त्यांच्या मानसिकतेवर प्रचंड आघात झाला होता. मानसिक परिणामात 6% महिलांना निद्रानाशचा त्रास झाला झालेल्या अत्याचाराची आठवण झाली तर पिडीत महिला बैचेन होत तर 7% महिलांत अपराध भावना वाढीस लागली होती व 1% महिलांत मुलांच्या सुरक्षितते विषयी काळजी वाटत होती अत्याचार केलेल्या व्यक्तीवर अत्याचार प्रतिबंध कायदयातंर्गत कार्यवाही केल्यामुळे हे लोक हल्ला करतील किंवा कार्यवाहीचा बदला घेतील अशी असुरक्षिततेची भावना 9% पिडीतात झाली होती.

**आरोग्यावर परिणाम**

अत्याचारामुळे स्त्रिच्या आरोग्य व प्रजनन क्षमता यावर परिणाम होतो. आरोग्यासोबतच स्त्रिच्या सामाजिक प्रकार्यात्मकता यावर परिणाम होऊन ती स्त्रि आपली भुमिका प्रभावीपणे पार पाडुन शकत नाही, यातुन अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात प्रसंगी स्त्री आत्महत्याही करु शकते. अत्याचारामुळे झालेल्या आरोग्यावर परिणामाची परिणिती विविध आजारात होते तसेच आजही भारतातील ग्रामीण भागात उपचार केंद्र अथवा दवाखाने, उपलब्ध नाहीत त्यामुळे साधारण आजार गंभीर रुप धारण करु शकते शारीरीक इजेमुळे सातत्याने होणारे आजार अपंगत्व त्रास इतर आजार जडतात.

**सारणी क्रमांक**
**शारिरीक परिणाम**

| अ क्र. | विवरण | टक्केवारी |
|---|---|---|
| 1. | जखमी | 05 |
| 2. | तात्पुरते उपचार घ्यावे लागले | 21 |
| 3. | रुग्णालयात दाखल केले | 02 |
| 4. | शारीरीक त्रास | 03 |
| 5. | नियमित उपचार | 05 |
| 6. | काहीच नाही | 64 |
| | | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

अत्याचाराच्या काळात स्त्रि जर गर्भवती असेल तर अत्याचारामुळे झालेल्या मानसिक व शारीरीक त्रासाचे परिणाम गर्भातील मुलांवर होऊ शकते वा प्रजनन क्षमतेवर वाईट परिणाम होतो किंवा आई व मुलगा या दोन्ही करीता धोकादायक ठरु शकते.

पिडित महिलांवर अत्याचाराचा परिणाम त्यांच्या शारीरीक बाबीवर पण झाला अत्याचार करणा-या पिडीत महिला व अत्याचार करणाऱ्या व्यक्ती यांच्यात झालेल्या बाचाबाची व प्रतिक्रीया यामुळे झालेल्या मारहाणीमुळे 21% महिलांना रुग्णालयात उपचार घ्यावे लागले.

बलात्कार पिडित महिलेस शारीरीक त्रास झाला असे 3% पिडीतांनी सांगितले तर अत्याचारामुळे 5% महिलांनी नियमित उपचार घ्यावे लागते. अत्याचाराचा सर्वाधिक परिणाम हा विनयभंग व बलात्कारास बळी पडलेल्या महिलांत दिसुन येतो तर 64% पिडीतांना किरकोळ शारीरीक इजा व्यतिरिक्त कोणतेही प्रवृततीचे प्रश्न निर्माण झालेले नाही.

**निष्कर्ष**

अत्याचार पडिती दलीत महिलांना एकाच वेळेस बहु आयामी समस्यांना तोंड दयावे लागले तसेच अत्याचाराबरोबरच इतर समाजाच्या किंवा सवर्णांच्या मानसिकतेचा

ही त्रास झाला.गावातील सार्वाजनिक सेवांचा लाभ घेतांना या महिलांना मानसिक त्रासास सामोरे जावे लागले.सार्वजनिक नळावर पाणी भरतांना इतर महिलांकडुन मिळणारी वागणुक, आरोग्य सेविकांचे दुर्लक्ष वा टाळणे, किराणा दुकान, पिठाची गिरणी इ. ठिकाणी मिळणारे टोमणे वा वापरण्यात येणारी भाषा, वागणुक यामुळे पिडीत महिलांना सार्वजनिक सेवा सुविधांचा योग्य लाभ घेता आला नाही.

अत्याचाराचे स्वरुप आणि ठिकाण याविषयीचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की, महिलेवर गावात, शेतात, कामाच्या ठिकाणी, राहत्या घरी व इतर ठिकाणी विनयभंग, छेडछाड, बलात्कार, जातीवाचक शिवीगाळ, शारीरीक संबंध व लैगिंक छळ यासारखे अत्याचार झालेले दिसुन येतात.

अत्याचाराच्या सामाजिक परिणामाचा आढावा घेण्याकारीता सामाजिक अंतरक्रियावर झालेल्या परिणामाचा शोध घेण्यात आलेला आहे यात मुक्त संवाद, इतर जातीतील व्यक्तीशी संवाद, शेजारी, नातेवाईक, सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम व लग्न समारंभ इत्यादी समावेश करण्यात आला असुन या आतंरक्रियेत वाढ, कमी, बदल नाही असे पर्याय देण्यात आले होते. एकुण सारणीचा विचार केला असे दिसुन येते की, पिडीत महिलांच्या सामाजिक आंतरक्रियेत अत्याचारामुळे परिणाम झालेला आहे.

भावानात्मक परिणामाचा शोध घेण्याकरीता, बेचैन, उदासिनता, राग, भिती, अस्वस्थता, दु:ख, अपमानित, आघात, निद्रानाश, अपराध भावना, मुलांची काळजी, असुरक्षितता इत्यादी मानके तयार करण्यात आली होती. शारीरीक परिणामांचा अभ्यास करण्याकरीता जखमी, तात्पुरते उपचार घ्यावे लागले, रुग्णालंयात दाखल केले, शारीरीक त्रास, नियमित उपचार आणि काहीच नाही इत्यादी मानकांचा वापर केला.

**संदर्भसूची**

1. सिसोदीया यतीन्द्रसिंह. "पंचायत राज एवम अनुसूचित जाती मे महिला नेतृत्व", नवी दिल्ली रावा पटिलीकेशव पृ.क्र. 2000; 18:19.
2. पटिल केशव. हरीजन युवंकोका राजनैतिक सामाजिकरण- नवी दिल्ली पृ.क्र. 1991, 26.
3. Mukta Mittal. Dait Women in India (Survial & current Dilemm), New Delhi, Arise Publisher, 2010, 34.
4. लांजेवार ज्योती. फुले- आंबेडकर आणि स्त्रि मुक्ती चळवळ, नागपुर, संकेत प्रकाशन पृ.क्र. 2008, 85.
5. त्रिशरण विजयकुमार. दलित अधिकार चेतना"दिल्ली, गौतम बुक सेंटर, पृ.क्र. 2010, 46.